**शुध्दीपत्रक**
**शिक्षण विभाग (प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

**विषय:- "ज्योती सावित्री इंटरनॅशनल स्कूल खानवडी" या शाळेसाठी अनुभवी नामांकित शैक्षणिक संस्थेकडून मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यासाठी अर्ज मागविण्यात आलेले होते सदर अर्ज मागविणेची मुदत संपुष्ठात आल्यामुळे परत मुदत वाढवून देणेबाबत...**

"ज्योती सावित्री इंटरनॅशनल स्कूल खानवडी" ता. पुरंदर जि.पुणे ही इयत्ता ६ वी ते इयत्ता १२ वी पर्यंतची मुलींची स्वयंअर्थसहाय्यित निवासी शाळा स्थापन करण्यात येणार आहे. सदरच्या शाळेसाठी अनुभवी नामांकित शैक्षणिक संस्थेकडून मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यासाठी दिनांक ११/१०/२०२२ व दिनांक १२/१०/२०२२ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती व अर्ज मागविण्यात आलेले होते. अर्ज मागविणेसाठी जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांची मुदत देण्यात आलेली होती. सदरची मुदत ही दिनांक २६/१०/२०२२ रोजी पूर्ण झाली होती. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पुणे यांच्या सूचनेनुसार पुन्हा संस्थाना प्रस्ताव सादर करण्यासाठी १५ दिवसांची मुदतवाढ (दिनांक १० नोव्हेंबर पर्यंत) देण्यात आलेली होती.

दिनांक २२/११/२०२२ रोजी झालेल्या प्रकल्प समितीच्या बैठकीमध्ये अनुभवी नामांकित शैक्षणिक संस्थेकडून मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यासाठी अर्ज मागविणेसाठी दिनांक १५ /१२ /२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

(आयुष प्रसाद, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे जिल्हा परिषद, पुणे